दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ११८ वा शनिवार दि.१२ ऑक्टोंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## देशाचे भविष्य विद्यार्थ्यांच्या हातात - क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे

### मागील ५० वर्षापासून रखडलेला खेळाडूंच्या मैदानाचा प्रश्न सोडवला







उदगीर/ प्रतिनिधी :- ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विविध क्रीडा प्रकाराच्या सोयीसुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून १५ कोटी रुपयाचे उदगीर शहरात मिनी तालुका क्रीडा संकुलाची उभारणी आज आपण करत आहोत. या संकुलाचा फायदा या भागातील विद्यार्थी व खेळाडूंना होणार असून आता आपल्या मातीतून देशपातळीपर्यंत खेळाडु तयार होतील कारण देशाचे भविष्य हे आपल्या विद्यार्थ्यांच्या हातात असल्याचे मत क्रीडा व युवक कल्याण बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केले. ते उदगीर शहरातील नव्याने उभारण्यात येत असलेल्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत तालुका क्रीडा संकुल उदगीरच्या भुमीपुजन सोहळ्याप्रसंगी बोलत होते. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, तहसीलदार राम बोरगावकर, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, माजी सभापती सिद्धेश्वर पाटील, समीर शेख, प्रा.श्याम डावळे, बालाजी भोसले, वसंत पाटील, सय्यद जानीमियाँ, शशिकांत बनसोडे, फैजुखाँ पठाण, फय्याज शेख, शफी हाशमी, नवनाथ गायकवाड, अनिल मुदाळे, कुणाल बागबंदे, गिरीष उप्परबावडे, वैशाली कांबळे, प्रमोद केंद्रे, ईश्वर बेंबरे, अझहर मोमीन, दिलीप शिंदे, अखिल मोमीन, विरभद्र पाटील, अरविंद बिरादार, रऊफ गुडसुरकर, प्रमोद काळोजी, तालुका क्रीडा अधिकारी चंद्रकांत लोदगेकर, कोल्हे, कराड आदी उपस्थित होते. पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी, ग्रामीण भागातील खेळाडूंच्या उज्वल भविष्यासाठी क्रीडा संकुलाची उभारणी आपण करत असुन जिल्ह्यातील १ नंबरचे क्रीडा संकुल आपल्या उदगीर येथे उभारले जात आहे. मागील ५० वर्षापासून रखडलेला खेळाडूंचा मैदानाचा प्रश्न आपण सोडवला असल्याने आता आपल्या भागातुन अनेक खेळाडु तयार होतील. पुढील काळात यापेक्षा मोठे क्रीडा संकुल आपण उभारणार असुन त्यासाठी ८३ कोटी रुपयाचा निधी मंजूर केला आहे. त्यातुन भव्य - दिव्य क्रीडा संकुल लवकरच उभारणार आहे. १५ जानेवारी हा दिवस स्व.खाशाबा जाधव यांचा जन्मदिन आहे. म्हणून आपण त्यांचा जन्मदिन हा राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा केला व त्यांच्याच नावाने उदगीर शहरात आपण राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा घेतली. या मिनी तालुका क्रीडा संकुलात फुटबॉलचे मैदान, व्हॉलीबॉलचे मैदान, वॉंकींग ट्रॅक, खेळाडुंसाठी चेजिंग रुम, मिटींग हॉल व संरक्षण भिंत आदींचा समावेश आहे. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन तालुका क्रीडा अधिकारी कृष्णा केंद्रे यांनी केले. यावेळी क्रीडा प्रशिक्षक, खेळाडु व क्रीडा प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## उद्योग वाढीसाठी उद्योजकांना सर्वतोपरी मदत करू

### माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर शहरातील उद्योजकाशी साधला संवाद



लातूर / प्रतिनिधी :- उद्योजक मित्र मंडळ लातूरच्या वतीने उद्योजकांसोबत हितगुज संवाद आपुलकीचा संवाद प्रगतीचा या कार्यक्रमाचे आयोजन आज गुरुवार दिनांक १० ऑक्टोबर रोजी सायंकाळी सनरीच ऑक्का बाईकाकाजी ऑक्काशुअर प्रा. लि. डी-६७ अतिरिक्त एमआयडीसी लातूर येथे करण्यात आले होते या कार्यक्रमास राज्याचे वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी उपस्थित राहून लातूर शहरातील उद्योजकांशी संवाद साधून द्योग वाढीसाठी उद्योजकांना सर्वतोपरी मदत करू अशी ग्वाही दिली. यावेळी बाईकाकाजी उद्योग समूह लातूरचे संचालक बालकिशन मुंदडा संचालक प्रमोद मुंदडा मीनाक्षी सालवेक्सचे संचालक बी एस पवार लातूर जिल्हा उद्योग समूहाचे अध्यक्ष चंदुलाल बलदवा ज्येष्ठ उद्योजक जवाहरलाल धुत लातूर दाळमील असोसिएशनचे अध्यक्ष हुकूमशेठ कलंत्री लातूर जिल्हा माहेश्वरी सभेचे अध्यक्ष सीए प्रकाश कासट योगेश मुंदडा कृष्णा मुंदडा शिवम पल्लोड शुभम धूत दिलीप मुंदडा अक्षय मुंदडा आकाश मुंदडा राजू मुंदडा बालाप्रसाद बिदादा शाम धूत अशोक धुत, निलेगावकर लोया डॉक्टर चेतन सारडा आनंद मालू आदीसह मुंदडा कुटुंबीय मित्रपरिवार उद्योजक उपस्थित होते. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की उद्योजकांच्या अपेक्षा लातूर खूप पुढे जावं अशा आहेत आपले पाच दशक जुन नात आहे लोकनेते विलासराव देशमुख माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांनी जिल्ह्याचा विकास केला एवढ्या वर्षात कधीही लातूरच्या राजकारणाला गालबोट लागले नाही उद्योजकांना सुरक्षित भावना लातूरमध्ये अनुभवायला मिळते ती इतरत्र कोठेही अनुभवायला मिळत नाही आज राजकारणाचा स्तर खालावत चालला आहे उद्योजकांच्या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष नाही उद्योजकांना अडीच वर्षे वीज पुरवठ्यासाठी वाट पाहावी लागत आहे सत्ताधारी फक्त फोडाफोडीचे राजकारण पैशातून सत्ता असे त्यांचे धोरण आहे त्यांचा दृष्टिकोन स्वच्छ नाही भ्रष्टाचार राज्यात लातुरात फोफावला आहे महाराष्ट्रात उद्योजक टिकवायचा असेल तर महाराष्ट्रच हित जोपासणार सरकार असायला हवे असे त्यांनी सांगितले पुढे बोलताना ते म्हणाले की लातूर रेल्वे कोच कारखान्याचे तीनदा उद्घाटन झाले परंतु अद्यापही त्यातून रेल्वे कोच बाहेर आला नाही एक लाख लोकांना येथे रोजगार उपलब्ध होणार असे म्हणाले होते ते रोजगार उपलब्ध झाले नाहीत एमआयडीसी उद्योजकांना कर आकारते तेव्हा त उद्योजकांना रस्ते वीज पुरवठा पाणीपुरवठा पथदिवे या सर्व सोयी सुविधा चांगल्या दर्जाच्या दिल्यापाहिजेत राज्यात व लातूरात कायदा व सुव्यवस्था राखणे गरजेचे आहे गृहखात्याचा जरब दबदबा कमी झाला आहे लातूरच्या प्रगतीत लातूरच्या उद्योजकांचे योगदान आहे लातूरला आपणाला आणखी पुढे घेऊन जायचे आहे महाविकास आघाडीचे सरकार राज्यात आल्यावर उद्योगांचे सर्व प्रश्न सोडवले जातील इज ऑफ डूइंग बिजनेस सध्या कुठे आहे



सरकारचे फक्त बोलाचा भात बोलाची कढी असे वागणे आहे असे त्यांनी सांगितले बाईकाकाजी उद्योग समूह लातूरचे संचालक प्रमोद मुंदडा यांनी प्रास्ताविक केले.लातूर जिल्हा उद्योग समूहाचे अध्यक्ष चंदुलाल बलदवा लातूर दाळमील असोसिएशनचे अध्यक्ष हुकूमशेठ कलंत्री लातूर जिल्हा माहेश्वरी सभेचे अध्यक्ष सीए प्रकाश कासट यांनी मनोगत व्यक्त करून उद्योजकासमोरील अडचणी व्यक्त केल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक गोपाळ बाहेती यांनी केले तर शेवटी आभार बालकिशन मुंदडा यांनी मानले.

## संपादकीय....

# मते आणि मने!

लोकसभा तसेच ताज्या विधानसभा निवडणुकांमध्ये 'रामजन्मभूमी', 'अनुच्छेद ३७०' किंवा 'अदानीअंबानी' हे मुद्दे चालल्याचे दिसले नाही निवडणुकीत जय असो वा पराजय. त्यास एकच एक कारण नसते. विजय असेल तर त्याचे पालकत्व घेण्यास अनेक तयार असतात आणि पराजयासाठी एकमेकांकडे बोट दाखवणारेही कमी नसतात. त्यात माध्यमांची कोणा ना कोणास 'चाणक्य' पदावर बसवण्याची हौस! गेल्या इतक्या निवडणुकांत आपल्याकडे इतक्या साऱ्या चाणक्यांची निर्मिती झालेली आहे की ती अशीच सुरू राहिली तर 'नागरिक कमी; चाणक्य फार' अशी अवस्था व्हायची. ताज्या निवडणुकाही या चाणक्य निर्मितीस अपवाद नाहीत. तथापि या वेळी ही चाणक्य निर्मिती फक्त हरियाणा या एकाच राज्यापुरती मर्यादित दिसते. काही माध्यमांच्या मते हरियाणात जे काही झाले ती चार चाणक्यांची किमया, अन्य कोणी हे चाणक्य तीन असल्याचे सांगतात. ते असतील तितके असतील. पण जम्मू-काश्मीरबाबत असे कोणी चाणक्य नसावेत; असे दिसते. म्हणजे त्या राज्याचा निकाल चाणक्यांशिवायच लागला म्हणायचा. फारुख आणि ओमर या अब्दुल्ला पितापुत्रांच्या 'नॅशनल कॉन्फरन्स' विजयास कोणत्याच चाणक्याचा हात लागलेला दिसला नाही. असो. मुद्दा चाणक्य आणि त्यांच्या निर्मितीची माध्यमांची हौस हा नाही. यापेक्षाही एक महत्त्वाचे सत्य या निवडणुकांच्या निकालांतून दिसते. या विधानसभा निवडणुकांस चार महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकांचा निकालही जोडल्यास या मुद्द्याची व्याप्ती अधिक वाढू शकते. हा मुद्दा आहे दोन प्रमुख पक्षांनी हाती घेतलेल्या प्रमुख विषयांचा. या दोन निवडणुकांचे निकाल आणि त्यातील दोन राजकीय पक्षांची कार्यक्रमपत्रिका यावर यानिमित्ताने भाष्य करणे सयुक्तिक ठरावे. प्रथम भाजपविषयी. दिसते ते असे की चार महिन्यांपूर्वीच्या लोकसभा निवडणुका असोत वा ताज्या हरियाणा, जम्मू-काश्मीर या राज्यांतील विधानसभा निवडणुका. या दोन्ही निवडणुकांत भाजपच्या कार्यक्रमपत्रिकेवरील त्या पक्षास प्राणप्रिय असलेले दोन अत्यंत जिव्हाळ्याचे विषय निष्प्रभ ठरले. रामजन्मभूमी आणि 'अनुच्छेद ३७०' हे दोन मुद्दे. हे दोन्ही विषय राष्ट्रीय स्वयंसेवक संघासाठी आत्मतेजाशी जोडले गेलेले आहेत. अयोध्येतील बाबरी मशीद पाडून तेथे जोपर्यंत प्रभू राम मंदिर उभे राहत नाही आणि जोपर्यंत जम्मू-काश्मिरास भारतापासून विलग मानणारे 'अनुच्छेद ३७०' रद्द होत नाही तोपर्यंत भारत हा देश म्हणून आत्मविश्वासाने उभा राहू शकणार नाही, असे हिंदुत्ववादी विचारधारा मानते. त्यामुळे भाजपचा आधीचा अवतार असलेल्या जनसंघापासून जे काही मुद्दे त्या पक्षाच्या कार्यक्रमपत्रिकेवर आहेत त्यात हे दोन मुद्दे पहिल्या तिनांत आहेत. त्यामुळे १९९० पासून भाजपने रामजन्मभूमी चळवळ हाती घेतली आणि 'अनुच्छेद ३७०' रद्द व्हायला हवे ही त्या पक्षाची सातत्याने मागणी राहिली. त्याचमुळे २०२४ च्या लोकसभा निवडणुकांआधी हे दोन्हीही मुद्दे भाजपने सकारात्मकपणे निकालात काढले. गेल्या निवडणुकांनंतर 'अनुच्छेद ३७०' रद्द केले गेले आणि या लोकसभा निवडणुकांआधी दणक्यात अयोध्येत राम मंदिराचे उद्घाटन झाले. परंतु २०२४ च्या लोकसभा निवडणुकांत भाजपस ना प्रभू रामचंद्राने हात दिला ना ताज्या विधानसभा निवडणुकांत 'अनुच्छेद ३७०' रद्द केल्याचा लाभ भाजपस झाला. अयोध्येचे मंदिर ज्या मतदारसंघात आहे त्या फैजाबाद लोकसभा मतदारसंघात तर मुसलमान-स्नेही समाजवादी पक्षाच्या उमेदवाराने भाजपस हरवले आणि जम्मू-काश्मिरातील काश्मीर खोऱ्यात भाजपस एकही जागा मिळाली नाही. ही बाब फार महत्त्वाची. याचे कारण जे मुद्दे भाजपसाठी प्राणपणाचे आहेत, ज्यांच्यासाठी भाजपने आंदोलने केली, संघर्ष केला त्यातील एकही मुद्दा निवडणुकीत भाजपच्या मदतीस आला नाही. याच्या जोडीने भाजपसाठी तितकाच आणखी एक महत्त्वाचा विषय म्हणजे समान नागरी कायदा. तोही मुद्दा लवकरात लवकर भाजप निकालात काढणार नाहीच, असे नाही. सध्याच्या लोकसभेत सत्ताधारी पक्षाचे हात काही प्रमाणात तरी बांधले गेले असल्याने हा मुद्दा भाजपने तूर्त बाजूस ठेवला असेल. 'योग्य वेळी' तो कार्यक्रमपत्रिकेवर येईलही. तथापि जे अयोध्येतील राम मंदिराच्या मुद्द्याचे वा 'अनुच्छेद ३७०' रद्द करण्याच्या मुद्द्याचे झाले तेच 'समान नागरी कायदा' या मुद्द्याबाबतही होईल, असे मानण्यास जागा आहे. यावर 'हे मुद्दे राजकीय नाहीत', असा चतुर युक्तिवाद केला जाईल. त्यात काही अर्थ नाही. आता काँग्रेसच्या मुद्द्याबाबत. तो मुद्दा आहे देश 'अंबानी-अदानी' यांस आंदण दिला जाण्याचा आरोप. या मुद्द्याची तर काळजी वाटावी अशी परिस्थिती दिसते. भाजपने काही दशकांपूर्वी काँग्रेसवर बोफोर्स तोफा खरेदीप्रकरणी भ्रष्टाचाराचा आरोप केला आणि दशकभरापूर्वी २०१२ पासून त्यावेळच्या सरकारवर दूरसंचार घोटाळ्यावर काहूर माजवले. त्यातून काहीही निघाले नाही आणि ते भ्रष्टाचाराचे आरोप फक्त मथळ्यांपुरतेच राहिले. त्यातून सत्ताधारी काँग्रेसची बदनामी तेवढी झाली. तेव्हा त्याचा प्रतिवाद करण्याचा प्रयत्न म्हणून सध्या विरोधी पक्षात असलेला आता सत्ताधारी पक्षात असलेल्या भाजपवर भ्रष्टाचाराचा आरोप करतो किंवा काय, हा प्रश्न. तो पडण्याचे कारण म्हणजे कथित भ्रष्टाचार वा काही उद्योगपतींस दिली जाणारी कथित विशेष वागणूक हा मुद्दा मुळात नागरिकांच्या राजकीय जाणिवांस स्पर्श करतो का? या प्रश्नाचे उत्तर दुर्दैवाने होकारार्थी देता येणे अवघड. भारतीय नागरिकांसाठी भ्रष्टाचार हा तरी निवडणूक मुद्दा असतो का? दशकभरापूर्वीच्या निवडणुकांत हा मुद्दा महत्त्वाचा ठरला कारण त्यावेळच्या कथित भ्रष्टाचाराची सांगड त्या वेळी विरोधी पक्षात असलेल्या भाजपने नागरिकांस भेडसावणाऱ्या महागाईशी यशस्वीपणे घातली; म्हणून. म्हणजे त्या वेळी नागरिकांनी प्रामुख्याने विरोधात मतदान केले ते महागाईच्या. भ्रष्टाचाराच्या नव्हे. कथित भ्रष्टाचाराचा संबंध त्या वेळी महागाईशी जोडण्याचे चातुर्य हे रा. स्व. संघाचे आणि त्या संघीय कळसूत्रावर नाचणाऱ्या प्रभृतींचे. म्हणजेच भ्रष्टाचार हा खऱ्या अर्थाने त्याही वेळी निवडणूक मुद्दा अजिबात ठरला नाही. हे सत्य मान्य केले तर 'अदानी-अंबानी' हा निवडणूक मुद्दा कसा असू शकतो? लोकसभा निवडणुकीत एका तरी मतदाराने 'अदानी-अंबानी'च्या मुद्द्यावर मतदान केले असे ठामपणे सांगता येईल काय? याचे नकारार्थी उत्तर वेदनादायी आहे/असेल; हे खरे. तथापि या कथित उद्योगपतींच्या कथित अर्थगैरव्यवहारांवर मत व्यक्त करणारे या उद्योगपतींच्या घरांतील हिडीस संपत्तीदर्शनाचे ओंगळवाणे, लाळघोटे प्रेक्षक असतात, हेही खरे!! लोकसभा निवडणुकांत मतदान झाले घटनादुरुस्तीचा कथित प्रयत्न या मुद्द्यावर आणि त्या मुद्द्यावरही एरवी भ्रष्टाचारावर तावातावाने बोलणारे, नवनैतिकवादी, मेणबत्ती संप्रदाय सदस्य अजिबात पेटून उठले नाहीत. ज्यांच्या दैनंदिन जगण्याशी घटनेचा काहीही संबंध नसतो ते या कथित घटना बदलाच्या प्रयत्नामुळे खऱ्या अर्थाने अस्वस्थ झाले आणि त्यांच्या मतदानीय कृतीने इतरांस भान आले.

# वंद.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यस्मरण सप्ताह विशेष

तुकडोजी महाराज हे आधुनिक काळातील महान संत होते. आडकोजी महाराज हे त्यांचे गुरू. गुरुजींनी त्यांचे मूळचे माणिक हे नाव बदलून तुकडोजी असे केले. विदर्भात त्यांचा विशेष संचार असला तरी महाराष्ट्रभरच नव्हे तर देशभर हिंडून ते आध्यात्मिक, सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रबोधन करीत होते. एवढेच नव्हे तर जपानसारख्या देशात जाऊन त्यांनी सर्वांना विश्वबंधुत्वाचा संदेश दिला. म्हणूनच महाराष्ट्रभर आज त्यांना आपले आराध्य दैवत मानून भक्ती करणारी अनेक श्रीगुरुदेव सेवा मंडळे स्थापित झाली आहेत. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा लेखाजोखा श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी यांच्या लेखणीतून जरूर वाचा... संपादक.

तुकडोजी महाराज यांचे पूर्ण नाव माणिक बंडोपंत इंगळे होते. त्यांचा जन्म दि.३० एप्रिल १९०९ रोजी अमरावती जिल्ह्यातील यावली येथे झाला. त्यांना राष्ट्रसंत म्हणून ओळखले जाते. अंधश्रद्धा निर्मूलन व जातिभेदाच्या निर्मूलनासाठी त्यांनी भजनांचा आणि कीर्तनाचा प्रभावीपणे वापर केला. आत्मसंयमनाचे विचार त्यांनी ग्रामगीता या काव्यातून मांडले. त्यांनी मराठी व हिंदी भाषांमध्ये काव्यरचना केली आहे. तुकडोजी महाराजांनी इ.स.१९३५मध्ये मोझरी येथे गुरुकुंज आश्रमाची स्थापना केली. खंजिरी भजन हा प्रकार त्यांच्या प्रबोधनाचे वैशिष्ट्य होते. महाराज सांगत-

अरे! रिकामा कशाला फिरतं? तुझं गावच नाही का तीर्थ?।।धृ।। तुझ्या गावाची शाळा ही मोडली। धर्मशाळा तू शहरी का जोडली? याने निघतो का जीवनात अर्थ?।।२।।

भारत हा खेड्यांचा देश आहे, हे लक्षात घेऊन ग्रामविकास झाला की राष्ट्राचा विकास होईल, अशी तुकडोजी महाराजांची श्रद्धा व विचारसरणी होती. समाजातल्या सर्व घटकांतील लोकांचा उद्धार कसा होईल? याविषयी त्यांनी अहर्निश चिंता केली. ग्रामोन्नती व ग्रामकल्याण हा त्यांच्या विचारसरणीचा जणू केंद्रबिंदूच होता. भारतातील खेड्यांच्या स्थितीची त्यांना पुरेपूर कल्पना होती. त्यामुळे त्यांनी ग्रामविकासाच्या विविध समस्यांचा मूलभूतस्वरूपी विचार केला व त्या समस्या कशा सोडवाव्यात? याविषयी उपाययोजनाही सुचविली. या उपाययोजना त्यांच्या काळाला तर उपकारक ठरल्याच पण त्यानंतरच्या काळालाही उचित ठरल्या. हे आज तीव्रतेने जाणवते. अशा गोष्टींतूनच राष्ट्रसंतांचे द्रष्टेपण दिसून येते. सन १९४२च्या भारत छोडो आंदोलनादरम्यान काही काळ त्यांना अटक झाली होती. आते है नाथ हमारे हे त्यांनी रचलेले पद या काळात स्वातंत्र्य लढ्यासाठी स्फूर्तिगान ठरले होते. संतकवी महाशयांनी अशीच ललकारीही दिली-

झाडझडूले शस्त्र बनेंगे, भक्त बनेगी सेना। पत्थर सारे बॉम बनेंगे, नाव लगेगी किनारे।।

अमरावतीजवळ मोझरीच्या गुरुकुंज आश्रमाची स्थापना हे तुकडोजींच्या आयुष्यातील जसे लक्षणीय कार्य आहे, त्याचप्रमाणे ग्रामगीतेचे लेखन हाही त्यांच्या जीवनकार्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. ग्रामगीता ही जणू तुकडोजी महाराजांच्या वाङ्मयसेवेची पूर्तीच होय. स्वतःला ते तुकड्यादास म्हणत कारण भजन म्हणताना ते जी भिक्षा घेत, त्यावरच आपण बालपणी जीवन कंठिले, याची त्यांना जाणीव होती. खेडेगाव स्वयंपूर्ण कसे होईल? याविषयीची जी उपाययोजना महाराजांनी सुचविली होती, ती अतिशय परिणामकारक ठरली. ग्राम हे सुशिक्षित व्हावे, सुसंस्कृत व्हावे, ग्रामोद्योग संपन्न व्हावेत, गावानेच देशाच्या गरजा भागवाव्यात, ग्रामोद्योगांना प्रोत्साहन मिळावे, प्रचारकांच्या रूपाने गावाला नेतृत्व मिळावे, असा त्यांचा प्रयत्न होता. त्याचे प्रतिबिंब ग्रामगीतेत उमटले आहे. देवभोळेपणा, जुनाट कालबाह्य अंधश्रद्धा नाहीशा व्हाव्यात, याविषयी त्यांनी अविरत प्रयत्न केले. राष्ट्रसंत म्हणतात-

सर्व ग्रामासि सुखी करावे। अन्न वस्त्र पात्रादि द्यावे।। परि स्वतः दुःखचि भोगावे। भूषण तुझे ग्रामनाथा।। ऐसेचि होवो जनी वनी। संतोष होईल माझिया मनी।। मित्रत्व वाढो त्रैभुवनी। तुकड्या म्हणे ध्येय हेचि।। (पवित्र ग्रामगीता: अर्पण-पत्रिका: ओवी क्र.१ व ७)

सर्वधर्मसमभाव हेही या राष्ट्रसंताच्या विचारविश्वाचे एक वैशिष्ट्य होते. त्यासाठी तुकडोजी महाराजांनी सामुदायिक व सर्वधर्मीय प्रार्थनेचा आग्रहपूर्वक पुरस्कार केला. राष्ट्रसंत हे विवेकनिष्ठ जीवनदृष्टीतून एकेश्वरवादाचा पुरस्कार करत असत. धर्मातील अनावश्यक कर्मकांडाला त्यांनी फाटा दिला होता. आयुष्याच्या शेवटापर्यंत त्यांनी आपल्या प्रभावी खंजिरी भजनाच्या माध्यमातून त्यांना अभिप्रेत असलेल्या विचारसरणीचा प्रचार करून आध्यात्मिक, सामाजिक, राष्ट्रीय प्रबोधन केले. स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना कारावासही भोगावा लागला. अखिल भारतीय पातळीवर त्यांनी साधुसंघटनेची स्थापना केली. गुरुकुंज आश्रमाच्या शाखोपशाखा स्थापन करून त्यांनी शिस्तबद्ध सामाजिक कार्यकर्त्यांची एक फळीच निर्माण केली. गुरुकुंजाशी संबंधित असलेले हे सर्व निष्ठावंत कार्यकर्ते आजही त्यांचे हे कार्य अखंड व्रतासारखे चालवीत आहेत. देशभक्तांनी म्हटले-

चेत रहा हैं भारत दुखसे, आग बुझाना मुश्किल हैं। उठा तिरंगा बढ़ावे छाती, अब बहिलाना मुश्किल हैं।।

महिलोन्नती हाही महाराजांच्या विचारविश्वाचा एक लक्षणीय पैलू होता. कुटुंब, समाज व राष्ट्र यांची व्यवस्था ही स्त्रीवर कशी अवलंबून असते? हे त्यांनी आपल्या कीर्तनांद्वारे समाजाला पटवून दिले. त्यामुळे स्त्रीला अज्ञानात व दास्यात ठेवणे कसे अन्यायकारक आहे? हे त्यांनी अत्यंत प्रभावीपणे पटवून दिले. देशातले तरुण हे राष्ट्राचे भावी आधारस्तंभ आहेत. ते बलोपासक असावेत म्हणजे ते समाजाचे व राष्ट्राचे संरक्षण करू शकतील. ते नीतिमान व सुसंस्कृतयुक्त कसे होतील, याविषयीचे उपदेशपर व मार्गदर्शनपर लेखन तुकडोजींनी केले. या राष्ट्रसंताने आपल्या लेखनातून व्यसनाधीनतेचा तीव्र निषेध केला. ग्रंथकार म्हणतात-

याच गुणे 'मातृदेवो भव'! वेदाने आरंभीच केला गौरव। नररत्नांची खाण अपूर्व। मातृजाति म्हणोनिया।। (पवित्र ग्रामगीता: दृष्टिपरिवर्तन पंचक: अध्याय २०वा: महिलोन्नती- ओवी क्र.८)

ऐहिक व पारलौकिक यांचा सुंदर समन्वय संतकवीवर्यांच्या साहित्यात झाला आहे. त्यांनी मराठीप्रमाणेच हिंदी भाषेतही विपुल लेखन केले. आजही त्यांचे हे साहित्य आपल्याला मार्गदर्शन करीत आहे, यावरून त्यांच्या साहित्यात अक्षर वाङमयाची मूल्ये कशी दडली आहेत, याची सहज कल्पना येईल. राष्ट्रपतिभवनात झालेले त्यांचे खंजिरी भजन ऐकून राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांनी तुकडोजी महाराजांना राष्ट्रसंत म्हणून संबोधिले होते. मृत्युंजय संतश्रेष्ठ म्हणतात- तुकड्या कहे आँधी लाऊँ। मैं भी मर कर जी जाऊँ।।

वंद. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे महानिर्वाण आश्विन कृष्ण पंचमी शके १८९० अर्थात दि.११ ऑक्टोबर १९६८ रोजी गुरूकुंज मोहरी जिल्हा अमरावती येथे झाले. आजही त्यांच्या विचारांच्या प्रसिद्धीचे काम अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाद्वारे केले जाते. ग्रामगीता हा त्यांचा ग्राम विकासावरील ग्रंथ प्रसिद्ध आहे. या शिवाय हिंदीतून लिहिलेले लहरकी बरखा हे पुस्तकही प्रसिद्ध आहे. त्यांचे ग्रामगीता या ग्रंथामधील विचार सर्व सामान्यांपर्यंत पोहचावे याकरिता महाराष्ट्र शासनाने ग्रामगीता हा ग्रंथ पुनर्मुद्रित करून, सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिला आहे, हे विशेष!

!! वं.रा.सं.तुकडोजी महाराजांना पुण्यस्मरण सप्ताह निमित्ताने विनम्र अभिवादन !!

*************

संतचरणधूळ- श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.
(संत-लोक वाङ्मयाचे गाढे अभ्यासक व साहित्यिक)
द्वारा- श्रीगुरूदेव प्रार्थना मंदिराजवळ, रामनगर, गडचिरोली.
ता. जि. गडचिरोली, फक्त व्हॉटसॅप- ९४२३७१४८८३.

# धम्मक्रांती ६८ झाली तरीही भरकटत चाललोय !

सिध्दार्थ गौतमाने आपल्या सर्वस्वाचा, सर्व सुखोपभोगाचा व राजसत्तेचा त्याग केला. हा प्रसंग म्हणजे भारतात त्या काळी उदयास येत असलेल्या एका नवीन समतावादी युगाची सुरुवात म्हणावी लागेल.

गौतमाच्या मनात असंख्य विचारांचे काहूर माजले होते. या गुंतरगुंतीच्या व दुख:दायक व क्लेशदायक या काहूरातून स्वत: मुक्त होणे, अखिल मानवाला मुक्त करणे, या काहूराचे उगमस्थान नष्ट करुन त्याचा लय करणे या बद्दल सतत चिंतन व प्रदीर्घ मनन करीत असतांना त्यांना दिसून आले की, मानवी जीवनात दु:खमय अर्वाचीन अज्ञान, अंधश्रध्दा, द्वेष, क्रोध, विषमता, शोषण अशा अनेक प्रवृत्ती आहेत. या समस्यांचे उच्चाटन करण्याचा परिणामकारक व प्रभावी मार्ग शोधून काढला पाहिजे. त्यांचा एकच ध्यास त्यांना लागला होता. त्यांना खात्री होती की, एकदा का नाविण्यपूर्ण मार्ग सापडला व त्याचा उपयोग प्रामाणिकपणे आणि सचोटीने केला तर अखिल विश्वातील सर्व प्राणीमात्रांची दु:खातून मुक्तता होईल, त्यांचे कल्याण होईल, त्यांची सर्वांगीण प्रगतीही होईल. इतकेच नव्हे, तर समता, स्वातंत्र्य, बंधुत्व व न्याय या नैतिक मुल्यांवर आधारलेल्या एका उच्चतम मानवी संस्कृतीचा उदय होईल. सिध्दार्थाचा गृह त्याग म्हणजेच मानवी संस्कृतीच्या प्रदेशात जाण्याचे जणु एक महाद्वारच होते, असे म्हणावे लागेल.

भगवान बुध्दाने सारनाथ येथील मृगदयावनात बुध्दत्व प्राप्ती नंतर थोडया दिवसांनी जो प्रथम धम्मोपदेश केला, त्याला धम्मचक्र प्रवर्तन म्हटल्या गेले. मानवी जीवनातील दु:ख समुळ नष्ट करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे, अष्टांगीक मार्ग, सदाचाराचा, सद्गुणाचा मार्ग, जो तथागताने संपूर्ण जगाला दिला.

२५०० वर्षा पूर्वी भारतातुन लोप पावलेला बौध्द धम्म परमपूज्य बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महाप्रयासामुळे व दृढनिश्चयी नेतृत्वामुळे या देशात १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागनगरीत अवतीर्ण झाला. या दिवशी या महामानवाच्या जाहीर आदेशानुसार वंचितांना जगण्याचे बळ देत गुलामगिरीत जखडलेल्या शेकडो पिढयांचे मुक्तिदाता ठरलेले भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार न देणारा हिंदूधर्म नाकारत बुध्दधम्म घेऊन, जागतिक धम्म प्रवर्तन केले. भारतीय समाजाने (बहुसंख्य अस्पृश्य) एवढया प्रचंड अगणित संख्येने बुध्दधम्माचा स्वीकार करणे ही मानवांची एक उत्क्रांत अवस्था आहे असे मानले जाते.

बौध्द धम्माने पुन:श्च या देशात पदार्पण करण्याची ही ऐतिहासिक घटना महाराष्ट्रात घडून आल्याने महाराष्ट्र भूमी धन्य-धन्य झाली, पुनीत झाली. सम्राट अशोका नंतर महान दिव्य-भव्य अशी धम्मक्रांती डॉ बाबासाहेबांनी घडवून आणली. सर्व प्रकारचे शोषण नाकारले. प्रज्ञा, शील, करुणेचा मानवतावाद सांगीतला. बुध्दाचं तत्वज्ञान म्हणजे शांतपणे पण ठामपणे अन्यायाला विरोध करणं आणि समानतेसाठी लढणं हेच ध्येय आहे.

महाराष्ट्रातील पुर्वाश्रमी अस्पृश्य गणल्या जाणाया सर्वच समूहाची अथवा अस्पृश्येतर लोकांनी या पवित्र धर्माचा स्वीकार केला नसला तरी, ज्या समाजाने बौध्द धम्माचा स्वेच्छेने स्वीकार केला आहे त्या समाजाला आपल्या अस्मितेची पूर्ण जाणीव झाली आहे. त्या समाजाने बौध्द धर्माचा स्वीकार करुन इतर समाज बांधवांच्या निदर्शनात आणून दिले की, जो समाज इतरांची गुलामगिरी स्वीकारुन लाचारीचे जीवन जगण्याचे नाकारतो, त्याच समाजाची शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक अशा तीनही बाजुने सर्वांगीण प्रगती होत असते झालीच आहे. तो समाज उन्नतीच्या शिखरावर पोहचत असतो पोहचला सुध्दा. परंतू शोकांतिका अशी आहे की, आज समस्त बौध्द समाजामध्ये धम्म आचरणाच्या बाबतीत दुबळेपणा जाणवतो. त्यांच्या मनात एक प्रकारची उदासीनता आढळून येते. त्यामूळे धम्मश्रध्दा वृध्दींगत होण्यास वाव मिळत नाही. याची कारण मिमांसा करण्याची गरज आहे.



धर्मांतर होवून ६८ वर्षे लोटत आहेत, तरीही बौध्द समाजातील असंख्य बौध्द अनुयायी आपल्या अज्ञानातच धुंद आहेत. आज दीक्षांतरीत बौध्द समाज देव-देवस्की, मंत्र-तंत्र, बुवा-बावांच्या नांदी लागलेला दिसत नसता, तर तो विज्ञानवादी बुध्द-धम्माच्या तत्वाप्रमाणे आचरण केले असते. बौध्द समाजाची स्थिती ती आज आहे त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त प्रमाणात प्रगती झाली असती. तो नावाने बौध्द नसुन आचार-विचाराने बौध्द झाला असता. तसे पाहिले तर यामध्ये जून्या चाली-रितींना पूर्ण आहारी गेलेल्या अशिक्षित लोकांचा भरणा तर आहेच, परंतु सुशिक्षित लोकांचा भरणा देखील कमी नाही.

आजच्या समस्त बौध्द समाजाच्या वैशिष्टयापैकी सर्वात ठळक वैशिष्टय म्हणजे सुशिक्षित वर्गाची पराकोटीला गेलेली स्वार्थवृत्ती. आपसापसामधील मतभेद व एकमेंकांबद्दलची द्वेष भावना. सुशिक्षित लोकांनी निदान आपल्या भावी पिढीसाठी आपल्या समाजाचा मागील इतिहास विसरुन जाता कामा नये. कारण आपण आपल्या समाजाचा मागील इतिहास विसरलो तर आपल्या सारखे करंटे आपणच.

तेव्हा बौध्द बांधवांनी ही जाणीव ठेवावी की, आपल्याला जे वैभव लाभले आहे, ते केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या अथक परिश्रमामुळेच, त्यांच्या पुण्यांईनेच......एवढा तरी सर्वांनी आपल्या मनात सदैव कृतज्ञतेचा भाव ठेवावा. केवळ प्रतिमेला हार घालून त्यांच्या प्रतिमांसमोर मेणबत्या व अगरबत्या प्रज्वलित करुन भागणार नाही तर कृतज्ञतेची भावना ठेवून आपणांस जे काही अल्पसे का होईना, वैभव प्राप्त झाले आहे. त्यांच्याच सहाय्याने इतरांना सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक बाबतीत प्रगतीच्या मार्गाने वाटचाल करण्यासाठी तन-मन-धनाने मदत करावी. बुध्द-धम्म संघ यांचे प्रती अधिक श्रध्दा, निष्ठा वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहावे, तेव्हाच धम्मचक्राची गती वाढेल. एकीकडे कलबुर्गी येथे ५००० लोकांना धम्मदीक्षा कन्नड भाषेत २२ प्रतिज्ञा देण्याचं धाडस श्रीमती अंबिका लक्ष्मीकांत हुबळी यांनी केले. एवढया मोठया प्रमाणात दीक्षा देणारी ती भारतातील पहिली महिला आहे. दुसरीकडे आपण देवी-देवतांच्या मागे भरकटत चाललोय!

बौध्द धम्मावर अनेक नामवंत असे मराठी ग्रंथ सर्वसाधारण वाचकांना समजेल अशा साध्या सोप्या भाषेत प्रकाशित झालेले आहेत. या सर्वांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भगवान बुध्द व त्यांचा धम्म हा वंदनीय ग्रंथ सर्व बौध्द अभ्यासकांनी व साहित्यिकांनी प्रमाणभूत मानलेला आहे आणि या ग्रंथाच्या आधारे अनेक बौध्द साहित्यिक व अभ्यासक आपल्या मौलिक विचारांद्वारे समाज प्रबोधनाचे कार्य करीत आहेत, त्यात आपण सुध्दा सामील व्हावे इतुकी बौध्द बांधवांकडुन अपेक्षा करायला काही हरकत नाही. तेव्हाच बौध्द धम्म शिगेला पोहचेल. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या सर्वांना मंगलकामना !

**********

प्रभाकर सोमकुवर
नागपूर
भ्रमणध्वनी क्र. ०९५९५२५५९५२

# आरक्षणाची मर्यादा

महाराष्ट्रातील कोल्हापूरच्या दौर्यावर आलेले काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी तेथील एका कार्यक्रमात बोलताना देशातील आरक्षणाची मर्यादा ७५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याची गरज स्पष्ट केली. हा निर्णय घेण्यासाठी आम्ही केंद्र सरकारवर दबाव आणू अशी भूमिकासुद्धा जाहीर केली. गेल्याच आठवड्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीसुद्धा आरक्षणाच्या मुद्द्यावर तोडगा काढण्यासाठी आरक्षणाची मर्यादा ७५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याची गरज व्यक्त केली होती. असा निर्णय घेण्यासाठी आम्ही केंद्रातील सरकारला सहकार्य करू, असेही त्यांनी जाहीर केले होते. सध्या महाराष्ट्रात मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून जी वातावरणनिर्मिती झाली आहे त्या पार्श्वभूमीवर राहुल गांधी आणि शरद पवार यांनी घेतलेल्या या भूमिकेचा विचार करायला हवा. आरक्षणाचा निर्णय घेणे कोणत्याही राज्य सरकारच्या हातात नाही, तर ती केंद्र सरकारची जबाबदारी आहे असेच अप्रत्यक्षपणे राहुल गांधी आणि शरद पवार यांनी स्पष्ट केले आहे.

जरी महाराष्ट्रामध्ये आरक्षणासाठी मनोज जरांगे, लक्ष्मण हाके आणि इतर अनेक जण आपापल्या जातींना आरक्षण मिळावे म्हणून आंदोलन करत असले तरी राज्य सरकारच्या हातात काही नाही, केंद्राने पुढाकार घेतला तरच या विषयाला पूर्णविराम मिळू शकतो. देशात सध्या महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्यामध्ये मराठा आरक्षणासाठी आंदोलन सुरू आहे त्याशिवाय धनगर समाजानेसुद्धा आरक्षणासाठी आंदोलन सुरू केले आहे. आंदोलनाच्या निमित्ताने ओबीसी आरक्षणावर अन्याय होऊ नये म्हणून ओबीसी नेत्यांनीसुद्धा आंदोलन सुरू केले आहे. यापूर्वी देशातील राजस्थानमध्ये गुज्जर समाजाने, गुजरातमध्ये पटेल आणि पाटीदार समाजाने, पंजाब-हरियाणाच्या काही भागांमध्ये जाट समुदायाने आरक्षणासाठी आंदोलन केले होते.

या आंदोलनांना अनेक वेळा हिंसक वळणही लागले होते. महाराष्ट्रातील आरक्षण आंदोलने जरी शांततेच्या मार्गाने पार पडली असली, तरी त्यामुळे सामाजिक अशांतता मात्र निश्चितच निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर राहुल गांधी आणि शरद पवार यांनी सुचवलेला तोडगा मान्य करण्यासारखा आहे का, याचा विचार आता केंद्रातील मोदी सरकारला करावा लागणार आहे. खरे तर आतापर्यंत न्यायालयासमोर आलेल्या अनेक खटल्यांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने दरवेळी आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा जास्त वाढवू नये असेच निर्देश दिले होते. मंडल आयोगाच्या कालावधीमध्ये या आयोगाला आव्हान देणार्या ज्या याचिका दाखल झाल्या होत्या त्यामध्ये इंद्रा सहानी या गाजलेल्या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणावर शिक्कामोर्तब करत असतानाच आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा जास्त असू नये, असे सूचित केले होते.




असे असले तरी आज तामिळनाडू, तेलंगणा, अरुणाचल प्रदेश अशा अनेक राज्यांमध्ये आरक्षणांनी ५० टक्क्यांची मर्यादा आधीच ओलांडली आहे. मुळात केंद्र सरकारनेच काही वर्षांपूर्वी जेव्हा आर्थिक निकषावर आधारित १० टक्के आरक्षण घोषित केले तेव्हाच एकूण आरक्षण मर्यादा ६० टक्क्यांपर्यंत पोहोचली होती. विशिष्ट अशा परिस्थितीमध्ये राज्य सरकार आरक्षणाची मर्यादा वाढवू शकतात, असा जरी नियम काही खटल्यांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने केला असला तरी तो सर्वच वेळी लागू होत नाही. म्हणूनच महाराष्ट्र सरकारने जेव्हा मराठा आरक्षण लागू केले तेव्हा हायकोर्टाने त्याच्यावर शिक्कामोर्तब केले तरी सुप्रीम कोर्टाने मात्र ते आरक्षण घटनाबाह्य आहे असे सांगून रद्द केले होते. सर्वोच्च न्यायालय नेहमीच घटनेचा विचार करून निर्णय घेत असते.

साहजिकच राहुल गांधी किंवा शरद पवार यांच्यासारख्या नेत्यांनी मागणी केल्याप्रमाणे जोपर्यंत आरक्षणाची मर्यादा वाढत नाही तोपर्यंत घटनेत सांगितलेल्या विद्यमान आरक्षण मर्यादेचा विचार करूनच सर्वोच्च न्यायालय त्या विषयाचा अर्थ लावणार आहे आणि निर्देश देणार आहे. मुळात आता विविध कारणांनी आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा कधीच ओलांडली गेली असल्याने या नेत्यांनी मागणी केल्याप्रमाणे केंद्रातील विद्यमान सरकारने आता ५० टक्के ही मर्यादा वाढवून ७५ टक्क्यांपर्यंत नेण्यास काहीच हरकत नाही. अशाप्रकारची मर्यादा वाढवल्यामुळे जर देशातील अनेक राज्यांमधील आरक्षणाचा विषय संपणार असेल आणि आरक्षण आंदोलनामुळे निर्माण होणार्या सामाजिक अशांततेलासुद्धा पूर्णविराम मिळणार असेल तर सरकारने प्राधान्याने हा विचार करायला हरकत नाही.

अनेक विरोधी पक्षांच्या नेत्यांनी आरक्षणाची मर्यादा वाढवण्याची मागणी केली असली, तरी असा निर्णय अंमलात आणण्याचे श्रेय केंद्रातील सरकारला मिळू शकते. १० टक्के आर्थिक निकषावरील आरक्षण देऊन सरकारने ५० टक्क्यांचा उंबरा कधीच ओलांडला आहे. त्यामुळे आणखीन १५ टक्के जास्त आरक्षण देऊन जर आरक्षणाच्या विषयामुळे निर्माण होणार्या आंदोलनाला पूर्णविराम मिळत असेल तर या विषयाकडे सरकारने गांभीर्याने लक्ष द्यायला हवे. केंद्र सरकारने जर असा निर्णय घेण्यासाठी पुढाकार घेतला तर संसदेच्या व्यासपीठावर आम्ही त्यांना संपूर्ण सहकार्य करू अशी भूमिका शरद पवार आणि इतर सर्वच विरोधी पक्ष नेत्यांनी जाहीर केली असल्यामुळे आता हा आरक्षणाची मर्यादा वाढवण्याचा चेंडू सरकारच्या कोर्टात आला आहे, तो योग्यप्रकारे टोलवावा लागणार आहे.

# मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांच्या हस्ते १२० आश्रम शाळा, वसतिगृहांचे ऑनलाईन भूमिपूजन

## आदिवासी विकास विभागाचा प्रथमच ऑनलाईन सोहळा, किनवट तालुक्यातील चार शाळांचा समावेश

मंत्री डॉ. गावित म्हणाले आश्रम शाळांमध्ये मातृभाषेतून शिक्षण देण्याचा निर्णय केला. राज्यात २५० आदर्श आश्रमशाळा म्हणून विकसित करणार आहोत. १०० आदिवासी विद्यार्थ्यांना दरवर्षी संशोधनासाठी अधिछात्रवृत्ती दिली जात आहेत पशुपालन कुक्कुटपालन शेती उत्पादन प्रक्रिया उद्योगासाठी अर्थसहाय्य देऊन उद्योग करू पाहणाऱ्यांना आपण उभे करीत आहोत. शेवटी हा आदिवासी विकास विभाग तुम्हा सर्वांचा आहे दुर्लक्षित घटक ताकदीने उभारा रहावा, या हेतूने तुम्ही मागाल ते द्यायला आम्ही तयार आहोत. फक्त उचित तेवढे मागा असेही डॉ. गावित म्हणाले.



किनवट/शेख शौकत :–राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागाअंतर्गत नव्याने बांधकाम केलेल्या सुमारे १२० इमारतींचे ऑनलाईन पध्दतीने उद्घाटन व नविन इमारती बांधकामांचे भुमीपुजन आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांच्या हस्ते करण्यात आले. महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच इतक्या मोठ्या संख्येने आदिवासी विद्यार्थ्यांच्या शाळा वसतिगृहांच्या इमारतींचे भूमिपूजन व उद्घाटन झाले आहे. त्यामध्ये किनवट तालुक्यातील पाटोदा, बोधडी, तलाईगुडा, सारखणी या आदिवासी आश्रम शाळांचा समावेश आहे. या अर्थाने महाराष्ट्राचे आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांच्या हस्ते पार पडलेला हा ऑनलाईन सोहळा संपूर्ण महाराष्ट्रात लक्षवेधी ठरला. नंदुरबार येथे बुधवारी (दि.९) नंदुरबार शहरातील शासकीय आदिवासी वसतिगृह आवारात हा सोहळा पार पडला. ऑनलाईन उद्घाटन व भूमिपूजन झालेल्या १२० पैकी ४९ इमारती नंदुरबार जिल्ह्यातील असल्याची माहिती याप्रसंगी देण्यात आली. विशेष अतिथी म्हणून उपस्थित असलेल्या नंदुरचार जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा डॉ. सुप्रिया गावित, नंदुरबार प्रकल्प अधिकारी चंद्रकांत पवार, तळोदा प्रकल्प अधिकारी अमेय नावंदर, धुळे प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, नाशिक अधीक्षक अभियंता विजय पाटील, नाशिक येथील कार्यकारी अधीक्षक अभियंता नीरज चौरे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळीविकासमंत्रीडॉ.गावितम्हणालेकी,आदिवासीसमाजातीलगरिबी आणि मागासलेपण संपवायचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. या दृष्टिकोनातूनच आदिवासी विकास विभागाने आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षण सुविधांसाठी भरभरून योजना दिल्या. अर्थसहाय्य देणे सुरू केले आहे. येत्या काही दिवसांत आदिवासी शाळा आणि वसतिगृहांचे संपूर्ण डिजिटलायझेशन केले जाईल. कोणत्या शिक्षकाने काय शिकवले विद्यार्थ्यांनी काय जेवण केले. यांसारख्या सर्व गोष्टींवर कॅमेरा नजर ठेवणार असून ती यंत्रणा कार्यान्वित केली जाईल. शिक्षणासाठी ज्या ज्या सोयी लागतील त्या शंभर टक्के उपलब्ध करून देणार आहे. कारण आदिवासी मुलांचे शिक्षण दर्जेदार झालेच पाहिजे यावर माझा भर आहे. त्यासाठी आतापर्यंत दिले जाणारी १५००ची रक्कम वाढवून २२०० केली. आदिवासी विद्यार्थ्यांना घरभाडे भत्ता लागू केला. दिवसागणिक शिक्षण पद्धती बदलत असल्याने मुलांना शिकवणारे शिक्षकसुद्धा अपडेट झाले पाहिजे, या हेतूने आश्रम शाळांमधून शिक्षण देणाऱ्या शिक्षकांची सुद्धा परीक्षा घेण्याची पद्धत आपण सुरू केली आहे. पाहिजे तितक्या शिक्षकांना पीएचडी करण्याची मुभा सुद्धा लागू करीत आहोत, अशी माहिती मंत्री डॉ. गावित यांनी दिली.

## तुमच्या मुलांना अभ्यास करताना सारखी झोप येते असेल, तर या टिप्स करा फॉलो

मुलांच्या या सवयीमुळे पालकांना अनेकदा त्रास होतो की, परीक्षेच्या वेळी अभ्यासाला बसताच त्यांच्या डोळ्यात झोप येते. पण हेच मूल डोळे मिचकावता तासन्तास टीव्ही किंवा मोबाईलकडे बघत राहतं. तुमचीही तुमच्या मुलाबाबत अशीच तक्रार असेल तर तुम्ही त्याला न डगमगता पालकत्वाच्या या काही टिप्स अवलंबून ही तक्रार दूर करू शकता. खरे तर मुलांचे मन खूप चंचल असते. अशा परिस्थितीत त्यांचे अभ्यासातून वारंवार उठणे किंवा विचलित होणे स्वाभाविक आहे. चांगल्या अभ्यासासाठी त्यांना दीर्घकाळ लक्ष आणि एकाग्रतेची आवश्यकता असते. जाणून घेऊया अभ्यास करताना मुलाला झोपण्यापासून कसे रोखता येईल. तुमच्या मुलांच्या झोपेच्या तासांसाठी एक दिनचर्या सेट करा मुलाच्या शरीरात उर्जेची पातळी चांगली ठेवण्यासाठी, सर्वप्रथम त्याच्या झोपेचे वेळापत्रक ठरवा. यासाठी मुलासाठी एक टाईम टेबल बनवा ज्यामध्ये त्याला उठण्याची आणि झोपण्याची ठराविक वेळ असेल. असे केल्याने मुलाच्या शरीराच्या अंतर्गत घड्याळाचे नियमन होण्यास मदत होते, ज्यामुळे मुलाच्या झोपेची गुणवत्ता सुधारते. मुलासोबत घेतलेल्या या उपायांमुळे त्याला अभ्यास करताना झोप लागण्याची शक्यता कमी होऊ शकते. नियमित वेळी ब्रेक घ्या ब्रेक न घेता बराच वेळ सतत वाचन केल्याने मुलाला मानसिक थकवा येतो आणि झोप येते. अशा परिस्थितीत या समस्येपासून आराम मिळवण्यासाठी पोमोडोरो तंत्राचा वापर करा. २५ मिनिटे या तंत्राचा अभ्यास केल्यानंतर, ५ मिनिटांचा ब्रेक घ्या. विश्रांती दरम्यान तुमच्या शरीरातील उर्जेची पातळी राखण्यासाठी, ताणून घ्या किंवा घराभोवती फिरा. निरोगी आहारासोबत हायड्रेटेड राहा शरीरात पाण्याची कमतरता आणि अनारोग्यकारक अन्न खाल्ल्याने मुलाला थकवा जाणवू शकतो. अशा परिस्थितीत, अभ्यास करताना, दरम्यान भरपूर पाणी प्या आणि आपल्या स्नॅक्समध्ये काजू, फळे किंवा दही यासारख्या गोष्टींचा समावेश करा. अभ्यासापूर्वी कधीही कार्बयुक्त पदार्थ खाऊ नका. असे अन्न खाल्ल्याने तुम्हाला सुस्ती आणि झोप येते. ध्येय निश्चित केले आहे

# राज्य मंत्रिमंडळाने १५ दिवसात १५६ पेक्षा अधिक निर्णय घेतले पुन्हा निवडून येणार नाही यामुळे असे निर्णय झाले सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब वसतीगृह व गुमास्ता भवनचे लोकार्पण माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख

सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने सामाजिक बांधिलकी म्हणून जळीत झालेल्या सोयाबीनसाठीच्या मदत निधीचा धनादेश शेतकऱ्यांना देण्यात आला.





लातूर /प्रतिनीधी : – आज देशात व राज्यात जे काही चालले आहे ते कायद्याची, नीतिमत्तेची मोडतोड करून चालले आहे याचा विचार सर्वांनी करावा असे सांगून राज्य मंत्रिमंडळाने या १५ दिवसात १५६ पेक्षा अधिक निर्णय घेतले आहेत, सत्ताधाऱ्यांना माहित आहे, आपण पुन्हा निवडून येणार नाही यामुळे असे निर्णय झाले आहे असे सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख म्हणाले. लातूर उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने लातूर शहरातील गूळ मार्केट येथे शेतकऱ्यांच्या मुलींसाठी उभारण्यात आलेल्या राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब वसतीगृहाचे व राष्ट्रीय गुमास्ता मंडळाच्या छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड लातूर येथील गुमास्ता भवनचे सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख व माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते शुक्रवार दि. ११ ऑक्टोंबर रोजी सकाळी लोकार्पण करण्यात आले यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी माजी आमदार वैजनाथ शिंदे, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, माजी सभापती ललितभाई शहा, चेंबर असोसिएशन अध्यक्ष पांडुरंग मुंदडा, आबासाहेब पाटील, श्रीपतराव काकडे, लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष किरण जाधव, राष्ट्रीय गुमास्ता मंडळ अध्यक्ष तुळशीराम गंभीरे, समद पटेल, विजय देशमुख, संतोष देशमुख, रवि काळे, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रभारी सचिव अरविंद पाटील, सहसचिव सतीश भोसले, सहाय्यक सहसचिव भास्कर शिंदे, आडत असोसिएशन अध्यक्ष चंद्रकांत पाटील, मनोज पाटील आदीसह आडते, व्यापारी, गुमास्ता, हमाल मापडी शेतकरी उपस्थित होते. राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब मुलींचे वसतिगृहात मुलींना राहण्यासाठी सुरक्षित आणि स्वच्छ वातावरण उपलब्ध करून देण्यात आले आहे. प्रत्येक खोलीत प्रकाश व्यवस्था चांगली आहे, अभ्यासीका, दर्जेदार फर्नीचर आणि खुली हवा आहे. यासोबतच, मुलींना अभ्यासासाठी शांत वातावरण उपलब्ध करून देण्यात आले आहे. या सर्व व्यवस्थेची सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी पाहणी केली. सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख याप्रसंगी बोलतांना म्हणाले की, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीतूनच माझ्या राजकारणाची सुरुवात झाली. तेव्हा माझे वय २३ वर्षे होते शेड हॉल बाजार समितीची ईमारत नाट्यगृह हे तेव्हा बांधले आहे. आज बाजार समितीचे २६ कोटी रुपये उत्पन्न झालेले आहे. एमआयडीसी परिसरात नवीन अद्यावत बाजारपेठ आंतरराष्ट्रीय स्वरूपाची होत आहे. मुलींच्या वस्तीगृहात माफक दरात त्यांची राहण्याची व्यवस्था करण्यात येईल असे सागीतले. छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड जातीच्या लोकसाठी काम केले. त्यांच्या पहिल्या गुरु राष्ट्रमाता जिजाऊ होत्या त्यांच्या शिकवणीनुसारच आपण सर्वांनी कार्य करावे असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की, लोकनेते विलासराव देशमुख यांनी सर्व समाजाला एकत्र घेऊन लातूरचा विकास केला, विकासाची, सदभावाची पेरणी प्रत्येकाच्या मनात त्यांनी केली. मार्केट यार्ड हे सर्व जाती धर्माचे लोक एकत्र येण्याचे ठिकाण आहे. शेतकरी, आडते, व्यापारी यांच्यातील विश्वासाची भूमिका ही गुमासतेची आहे. लातूरच वेगळेपण आपण सर्वांनी टिकविले पाहिजे, काँग्रेस पक्षाने व लोकनेते विलासराव देशमुख यांनी कार्यकर्त्यांची जात न बघता मदत केली, देशात व राज्यात जे काही आज चालले आहे ते कायद्याचे नीतिमत्तेची मोडतोड करून चालले आहे. राज्य मंत्रिमंडळाने या १५ दिवसात १५६ निर्णय घेतले आहेत सत्ताधाऱ्यांना माहित आहे, आपण पुन्हा निवडून येणार नाही असे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की येत्या विधानसभा निवडणुकीत लातूर जिल्ह्यातील महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवाराला निवडून द्या लोकसभेला आशीर्वाद दिला त्याच्यापेक्षा दुप्पट आशीर्वाद विधानसभेला द्या महायूतीच्या सरकारला दुरुस्त करता आता येणार नाही त्यामुळे त्याला बदलून टाका असे ते म्हणाले. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, लातूर कृषी उत्पन्न बाजार समिती ही राज्यातील नावाजलेली बाजार समिती आहे. या बाजार समितीच्या पुढाकाराने या परिसरात नव्या वास्तू उभ्या राहत आहेत, म्हणून आज आनंदाचा दिवस आहे. ही बाजार समिती समाजातील सर्व घटकांना समोर ठेवून काम करते, लोकनेते विलासराव देशमुख साहेबांचे स्वप्न होते लातूरात आंतरराष्ट्रीय दर्जाची बाजारपेठ उभे करणे. ती कामाला सुरुवात झाली आहे. रस्ते, वीज, नाल्या पथदिवेची कामे प्रगतीपथावर आहेत, नवीन बाजारपेठेचे कामही चालू आहे, तेथे जाणाऱ्या अडत्यांची नोंदणी उद्यापासून सुरू होईल असेही त्यांनी यावेळी सांगितले. महायूती सरकारने सर्व घटकावर अन्याय केला लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीने शेतकऱ्यांच्या मुलीसाठी उभारलेले वस्तीगृह हे राज्यातील पहिले वस्तीगृह माजी मंत्री आमदार अमित देशमुख पुढे बोलताना माजी मंत्री आमदार अमित देशमुख म्हणाले की, भाजीपाला विक्रेते व फळ विक्रेते यांना जागा उपलब्ध करून द्यावी अशी त्यांची मागणी आहे, लवकरच त्यांना जागा उपलब्ध करून देण्यात येईल. मुलांच्या वस्तीगृहाचीही दुरावस्था झालेली आहे, असे तेथील विद्यार्थ्यांनी मला सांगितले आहे, लवकरच तेथे दुरुस्ती करण्यात येईल. सध्या राज्यात आरक्षणाच्या संदर्भात अनेक आंदोलने झाली केंद्र व राज्य सरकार आरक्षणाचे राजकारण करत आहे, सध्या शेतकऱ्यांची पिळवणूक होत आहे. लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीने शेतकऱ्यांच्या मुलीसाठी उभारलेले वस्तीगृह हे राज्यातील पहिले वस्तीगृह आहे. लोकनेते विलासराव देशमुख, माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी आपणाला अनेक वर्ष जपले, दोन रुपये वर्गणी जमा करून गुमासत्यांनी निधी उभा केला, लातूरच्या विकासात राजकारण आडवे आणायचे नाही, लातूरचे हित प्रथम आपण जपले पाहिजे. येत्या काही दिवसात महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीची आचारसंहिता लागेल महायूती सरकारने सर्व घटकावर अन्याय केला आहे, आपणाला सामान्य जनतेचे महाविकास आघाडीचे सरकार निवडून आणायचे आहे असे त्यांनी सांगितले. यावेळी लातूर उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक सर्वश्री आनंद पाटील, श्री. तुकाराम गोडसे, ॲड. श्री. लक्ष्मण पाटील श्री. आनंद पवार, श्री. युवराज जाधव, श्री. श्रीनीवास शेळके, सौ. लतीका देशमुख, सौ. सुरेखा पाटील, श्री. सुभाष घोडके, श्री शिवाजी देशमुख, प्रा. डॉ. बालाजी वाघमारे, श्री. अनिल पाटील, प्रा. सचिन सुर्यवंशी, श्री. बालाप्रसाद बिदादा, श्री सुधीर गोजमगुंडे, श्री. शिवाजी कांबळे, अजय शहा आनंद मालु, डॉ. सतिष कानडे, भालचंद्र पाटील, डॉ. हर्षवर्धन राऊत, ॲड उदय गवारे, वैभव तळेकर, भगवान माकणे, विक्रम माकणीकर, विजय औढे, डॉ. कदम, धनंजय शेळके, शहाजी पवार, बाजीराव शिंदे, मुकेश राजमाने, संभाजी सूळ, अशोक अग्रवाल अशोक लोया, राजकुमार पाटील, मुकेश जाधव, ज्योतीराम कदम, किसन मंदाडे, संजय माने, हरिभाऊ जाधव, राम स्वामी, बालाजी जाधव, रजाक शेख आदी उपस्थित होते. लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, माजी सभापती ललितभाई शहा, राष्ट्रीय गुमास्ता मंडळ अध्यक्ष तुळशीराम गंभीरे यांनी मनोगत व्यक्त केले.शेवटी आभार सुभाष गंभीरे यांनी मानले.

# कै. रसिका महाविद्यालयात हिंदी काव्य पठण प्रतियोगिता संपन्न




देवणी /महेंद्र आल्टे : कै. रसिका महाविद्यालय देवणी येथील हिंदी विभाग व बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा निलंगा यांच्या संयुक्त विद्यमाने 'हिंदी माह उत्सव: २०२४' अंतर्गत 'हिंदी काव्यपठण प्रतियोगिता' घेण्यात आल्या. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बँक ऑफ महाराष्ट्र निलंगाचे शाखाधिकारी प्रवीण थोरात, प्रफुल्ल कांबळे राजभाषा अधिकारी (बँक ऑफ महाराष्ट्र) यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक हिंदी विभागप्रमुख प्रा. धनराज बिराजदार यांनी केले. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी या काव्यपठण स्पर्धेमध्ये उस्फुर्तपणे सहभाग घेतला. त्यामध्ये प्रथम क्रमांक या भोसले सपना विद्यार्थिनिने पटकावला. द्वितीय क्रमांक – साक्षी देवने, तृतीय क्रमांक– सना बौडीवाले व उत्तेजनार्थ – वीरेंद्र खानापुरे अशी पारितोषिके देण्यात आली. प्रथम विजेत्या स्पर्धकास एक हजार रुपये रोख रक्कम, प्रमाणपत्र व स्मृतचिन्ह देण्यात आले. पारितोषक द्वितीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यास ७५० रुपये रोख, प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह आणि तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थी पाचशे रुपये रोख रक्कम, प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. डॉ. प्रशांत भंडे, राजभाषा अधिकारी प्रफुल्ल कांबळे, प्रा. शुभम जाधव यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. डॉ. गोपाल सोमाणी यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लक्ष्मी ग्रँड मंगल कार्यालयाचे उद्या उदघाटन






लातूर : लातूर शहरातील खाडगाव रिंग रोडवर नव्यानेच उभारण्यात आलेल्या लक्ष्मी ग्रँड मंगल कार्यालयाचे उदघाटन रविवार, दि. १३ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी पाच वाजता माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार डॉ. शिवाजी काळगे हे राहणार आहेत. या प्रसंगी आर्य वैश्य महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार, आर्य वैश्य महासभेचे बांधकाम समिती अध्यक्ष भानुदास वट्टमवार, विलास को. ऑप. बँकेचे अध्यक्ष एड. किरण जाधव, क्रिडाई बिल्डर असो.चे अध्यक्ष जगदीश कुलकर्णी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या नूतन मंगल कार्यालयाच्या रूपाने लातूर शहर परिसरात एक अत्याधुनिक सोयी – सुविधांनी परिपूर्ण असे मंगल कार्यालय उपलब्ध होणार आहे. लॉन्स, प्रशस्त डायनींग – पार्किंग सुविधा, प्रशस्त अशा ३४ वातानुकूलित खोल्या या मंगल कार्यालयाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. लक्ष्मी ग्रँड मंगल कार्यालयाच्या उदघाटन सोहळ्यास लातूर शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन हरी वैजनाथ कोटलवार, दीपक हरी कोटलवार, आकाश दीपक कोटलवार यांनी केले आहे.

# अधिष्ठाता डॉ उदय मोहिते यांनी दसरा महोत्सव,बाभळगाव निमीत्त आयोजित करण्यात आलेल्या रामलीला कार्यक्रमास दिली भेट



लातूर / प्रतिनिधी :– बाभळगाव येथे दसरा महोत्सवानिमित्त आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्वामी श्री भुवनेश्वर वशीष्ठजी महाराज यांची रामलीला कथा कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, मैदान,बाभळगाव येथे आयोजीत करण्यात आली आहे.या रामलीला कार्यक्रमास विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयचे अधिष्ठाता डॉ उदय मोहिते यांनी रामलीला कार्यक्रमास भेट देऊन, आरती केली. बाभळगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या या रामलीला कार्यक्रमास विविध गावातील भाविक भक्त आपल्या कुटुंबीयांसह उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घेत असून बाभळगाव पंचक्रोशीतील नागरिकांचा दिवसेंदिवस या कार्यक्रमाला वाढता प्रतिसाद मिळत आहे.दसरा महोत्सवानिमीत्त बाभळगाव येथे नवरात्र महोत्सव समिती,ग्रामपंचायत,सेवा सोसायटी, तंटामुक्त ग्राम समिती व ग्रामस्थ बाभळगाव यांच्या वतीने रामलीला आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्वामी श्री भुवनेश्वर वशीष्ठजी यांची रामलीला कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, मैदान, बाभळगाव येथे सुरु आहे. या कार्यक्रमास विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयचे अधिष्ठाता डॉ उदय मोहिते यांनी उपस्थित राहून आरती केली आणि रामलीला कार्यक्रम पाहिला. यावेळी सरपंच प्रिया सचिन मस्के, उपसरपंच गोविंद देशमुख, ग्राम पंचायत सदस्य गोपाळ थडकर, पोपट अवघडे, व्हॉइस चेअरमन शिवाजी जाधव, माणिक सगर, दास गायकवाड, पांडुरंग देशमुख, भारत थडकर, प्रभाकर देशमुख, भानुदास आयरेकर, आप्पाराव तोडकर, सुभाष भोसले, शिवाजी मुळे, साधु मस्के, पोलीस पाटील मुक्तराम पिटले,महीला व ग्रामस्थ आदी उपस्थित होते. यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोविंद केंद्रे ठरले लातूर जिल्ह्याचे स्काऊट गाईड चळवळीतील सर्वोच्च प्रशिक्षण पूर्ण करणारे पहिले मानकरी

लातूर :- मागील वर्षी दिनांक एक डिसेंबर ते सात डिसेंबर २०२३ दरम्यान स्काऊट गाईड राष्ट्रीय प्रशिक्षण केंद्र पंचमढी मध्य प्रदेश या ठिकाणी संपन्न झालेल्या स्काऊट गाईड चळवळीतील युनिट लीडर यांचे सर्वोच्च प्रशिक्षण लीडर ट्रेनर या प्रशिक्षणाचा निकाल नुकताच महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट्स आणि गाईड्स राज्य कार्यालय मरीन लाइन्स मुंबई येथे प्राप्त झाला. यामध्ये राज्याचे सहाय्यक राज्य प्रशिक्षण आयुक्त स्काऊट गोविंद केंद्रे यांनी यश संपादन केले.. विशेषम्हणजे लातूर जिल्ह्यातून सदरील प्रशिक्षण यशस्वी करणारे ते लातूर जिल्ह्याचे पहिले मानकरी ठरले.. त्यांचे मूळ गाव सैनिक केंद्रेवाडी तालुका अहमदपूर जिल्हा लातूर हे असून वडिलांच्या नोकरीमुळे त्यांचे वास्तव्य व शैक्षणिक कार्यकाल नांदेड या ठिकाणी झाला. ते विद्यार्थी दशेपासूनच स्काऊट गाईड चळवळीमध्ये सक्रिय होते त्यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बरबडा तालुका नायगाव जिल्हा नांदेड येथे झाले असून माध्यमिक शिक्षण जवाहरलाल नेहरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बरबडा या ठिकाणी झाले. तत्कालीन स्काऊट मास्टर नागोराव टिप्पलवाड यांनी त्यांना स्काऊट गाईड चळवळीचे धडे शिकवले याच कालावधीत सन १९९७ या वर्षी तत्कालीन राज्यपाल महामहीम पी.सी. अलेक्झांडर यांच्या हस्ते केंद्रे यांना राज्यपाल पुरस्कार प्राप्त झाला.. तत्कालीन पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांच्या हस्ते केंद्रे यांना पंतप्रधान ढाल पुरस्कार ने सन्मानित करण्यात आले ते एवढ्यावर थांबले नाहीत पुढे त्यांनी विद्यार्थीदशेतील स्काऊट गाईड चळवळीतील अतिशय खडतड परीक्षा पात्र केली व नोव्हेंबर १९९९ या वर्षी तत्कालीन राष्ट्रपती महामही के. आर. नारायणन यांच्या शुभहस्ते राष्ट्रपती भवनामध्ये त्यांना राष्ट्रपती स्काऊट या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. योगायोगाने त्यांना स्काऊट गाईड चळवळीतच नोकरी करण्याची नामी संधी सन २००८ यावर्षी मिळाली व त्यांनी या चळवळीतील सर्वोच्च म्हणजेच डॉक्टरेट इन् स्टाऊटिंग संबोधल्या जाणाऱ्या लीडर ट्रेनर या प्रशिक्षणात यश प्राप्त केले.. चळवळीतील प्राथमिक प्रशिक्षण त्यांनी २००८ मध्ये पूर्ण केले, त्यानंतरचे प्रगत प्रशिक्षण सन २००९ यावर्षी पूर्ण केले, आवश्यक असणारे स्वाध्याय प्रशिक्षण २०११ या वर्षी पूर्ण केले, व राष्ट्रीय प्रशिक्षण केंद्र पंचमढी या ठिकाणी सन २०१३ या वर्षी हिमालयवूड बज प्रशिक्षण पूर्ण केले. त्यानंतरचे प्री. ए. एल. टी. हे प्रशिक्षण त्यांनी सन २०१५ यावर्षी पूर्ण केले. असिस्टंट लीडर ट्रेनिंग हे प्रशिक्षण त्यांनी सन २०१८ यावर्षी पूर्ण केले व नुकतेच लीडर ट्रेनर हे प्रशिक्षण पूर्ण केले.



रिजनल लेवल ट्रेनिंग ऑफ ट्रेनर्स वेस्टर्न रिजन च्या माध्यमातून सर्फ स्मार्ट, फ्री बीइंग मी, स्टॉप द वोईलेंच, मेसेंजर ऑफ पीस, ग्गीरींसळल प्लॅनिंग वर्कशॉप, नॅशनल लेवल मॅपिंग कम स्टार गेजिंग कोर्स, नॅशनल लेवल हँडीक्राफ्ट ट्रेनिंग, योगा ट्रेनिंग कोर्स, स्टेट लेवल फर्स्ट एड, मॅपिंग कोर्स यासारख्या बऱ्याच नॅशनल इव्हेंट मध्ये त्यांनी यशस्वी सहभाग नोंदविला. याच सोबत आज तागायत त्यांनी सहा नॅशनल जांबुरी मध्ये व तसेच तीन स्टेट लेवल राज्य मेळाव्यामध्ये यशस्वी सहभाग नोंदवून आपल्या कार्याचा ठसा नोंदवला, यामध्ये थर्ड सार्क अँड थर्ट्टींत नॅशनल जांबोरी खुर्द रोड ओरिसा, नॅशनल जांबोरी शंकरापल्ली हैदराबाद, नॅशनल जांबोरी अडकन हेली म्हैसूर, नॅशनल जांबोरी पाली राजस्थान, राज्य मेळावा अहमदनगर, राज्य मेळावा सिंहगड पुणे यांचा समावेश होता.. लातूर येथे जिल्हा संघटन आयुक्त या पदावर कार्यरत असताना त्यांनी सलग दहा जिल्हा मेळावा घेण्याचा विक्रम नोंदविला. हे कार्य करत असताना लातूर जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांना त्यांनी राज्यपाल पुरस्कार व तसेच राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त करून दिले व हजारो शिक्षकांना देखील प्रशिक्षित केले. त्यांच्या कार्यकाळात लातूर जिल्ह्यातील स्काऊट गाईड चळवळीची गुणात्मक आणि संख्यात्मक वाढ झाली. सध्या ते उपसंचालक कार्यालय क्रीडा विभाग लातूर या ठिकाणी प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत.. त्यांच्या या यशाबद्दल स्काऊट गाईड चळवळीत तील सिल्वर एलिफंट पुरस्कार प्राप्त माजी क्रीडामंत्री दिलीपराव देशमुख, विद्यमान क्रीडामंत्री संजय बनसोडे, लातूर भारत स्काऊट आणि गाईड संस्थेचे जिल्हाध्यक्ष डॉक्टर गोपाळराव पाटील, लातूर भारत स्काऊट आणि गाईड जिल्हा संस्थेचे उपाध्यक्ष आमदार विक्रम काळे, महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट आणि गाईड राज्यसंस्थेचे माजी राज्य मुख्य आयुक्त भाईदास ईश्वर नगराळे, दलित मित्र डी.बी. लोहारे गुरुजी, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे, माझी जिल्हा परिषद सदस्य अशोक केंद्रे, मुख्याध्यापक संघाचे माजी अध्यक्ष वसंतराव पाटील, महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट्स आणि गाईड राज्यसंस्थेच्या राज्यचिटणीस श्रीमती सारिका बांगडकर, माजी राज्यचिटणीस नागेश मोटे ,लातूर विभागीय क्रीडा कार्यालयाचे क्रीडा उपसंचालक युवराज नाईक, लातूरचे जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, क्रीडा अधिकारी जयराज मुंडे, कृष्णा केंद्रे, दत्ता गडपल्लेवार, श्रीमती सारिका काळे, सुरेंद्र कराड, श्री लटके, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रकाश देशमुख, चिटणीस बजरंग चोले, तानाजी पाटील, गोविंद गुडसुरे, राजकुमार पाटील, चंद्रकांत साळुंखे, श्रीमती दीपाताई गीते, श्रीमती शालिनीताई राचमाले, श्रीमती शाहीन पठाण, रामलिंग मुळे, लातूरचे स्काऊट गाईड जिल्हा संघटक डॉक्टर शंकर चामे, रमाकांत गरड, शरद हुडगे, मदन धुमाळ, युवराज माने, सौदागर सर, संतोष गुरव, धोंडीराम पाटील, सुनील स्वामी, राजेंद्र जाधव, सोमनाथ भातांगले आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

## बीड विधानसभा निवडणुकीसाठी शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून माजी आमदार अँड उषाताई दराडे रिंगणात..?

बीड / प्रतिनिधी :- बीड विधानसभा निवडणुकीसाठी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून माजी आमदार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील ज्येष्ठ नेत्या अँड उषाताई दराडे यांनी देखील पक्षाकडे अधिकृत तिकीट मागितले आहे. नुकत्याच झालेल्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतीमध्ये अँड उषाताई दराडे यांनी पक्षप्रमुख शरदचंद्र पवार साहेब यांच्यासमोर आपली बाजू कणखरपणे मांडली. त्यामुळे आता बीड विधानसभा उमेदवारी बाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये रंगत वाढणार हे नक्की. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख शरदचंद्र पवार यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी खऱ्या अर्थाने सर्वप्रथम ठोस पावले उचलली. त्यांनी शासन, प्रशासन, उद्योग व्यवसाय विविध क्षेत्रांमध्ये महिलांना देखील सन्मानाची संधी आणि वागणूक दिली. त्यामुळेच बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मौजे टाकळी सारख्या ग्रामीण खेड्यात जन्मलेल्या आणि मार्क्सवादी काँग्रेस पक्षातून जडणघडण झालेली असताना काँग्रेस पक्षातून पुढे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात त्यांना प्रवेश देऊन शरदचंद्र पवार साहेबांनी सन्मानाची पदे दिली. अँड उषाताई दराडे या उच्चशिक्षित बीएससी एलएलबी विधीज्ञ असून त्यांनी जिल्हा परिषद सदस्य ते जिल्हा परिषद चे अध्यक्ष पद देखील यशस्वीपणे सांभाळले होते. त्यांच्यातील नेतृत्व गुण आणि कार्यतत्परता लक्षात घेता पवार साहेबांनी त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडीचे प्रदेशाध्यक्ष पद देऊन राज्यांमध्ये त्यांचे नेतृत्व उभे केले.एवढेच नव्हे तर त्यांना आमदारांच्या निवडीतून विधान परिषदेवर आमदार म्हणून सदस्य देखील केले. आपल्या विधान परिषद सदस्याच्या काळात ताईंनी उत्कृष्ट वक्ता म्हणून राष्ट्रकुल संसदीय मंडळाचा पुरस्कार देखील संसदेत पटकावला होता. त्यांनी मराठवाडा विकास आंदोलनात सहभाग घेतला. मराठवाडा नामविस्तार लढ्यामध्ये करावास भोगला.आणीबाणी मध्ये त्यांना अटक झाली होती. त्यांनी श्रमिक महिला संघाच्या राज्यप्रमुख पदाची देखील जबाबदारी सांभाळली होती. आपल्या राजकीय, सामाजिक पटलावर त्यांनी स्वतःची एक वेगळी छबी निर्माण करण्यात यश मिळवले. बदलत्या राजकीय परिस्थितीत त्यांनी कायम शरचंद्र पवार साहेब यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून पक्षनिष्ठ आणि नेतृत्व निष्ठावंत म्हणून प्रामाणिकपणे कार्यकर्त्याची जबाबदारी पार पाडली.नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत मराठा ओबीसी असा संघर्ष टोकाचा गेलेला असताना सुद्धा त्यांनी स्वतः ओबीसी असताना सुद्धा पक्षाचे आदेश हेच अंतिम आदेश मान्य करून ओबीसी उमेदवाराच्या विरोधात मराठा उमेदवाराच्या



बाजूने पक्षाचा उमेदवार म्हणून प्रामाणिकपणे काम तर केलेच शिवाय मतांचे विभाजन टाळून मतांची जोडणी करण्यात यशस्वी झाल्यामुळेच अशक्य असा विजय लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणजेच महाविकास आघाडीच्या पारड्यात मिळू शकला. यामध्ये निश्चितच ताईंचा खारीचा वाटा नक्कीच होता. त्याचबरोबर विद्यमान विधानसभा निवडणुकीमध्ये पक्षाने विद्यमान आमदाराला त्याची निष्ठा पाहून पुन्हा एकदा संधी द्यावी अन्यथा पक्ष उमेदवार बदलणार असेल तर माझ्यासारख्या पक्षातील ज्येष्ठ आणि कर्तुत्व पाहून,महिला प्रतिनिधी म्हणून प्राधान्याने उमेदवारी द्यावी अशी केलेली प्रामाणिक मागणी बीड विधानसभा मतदारसंघातच नव्हे तर राज्यात एक आदर्शवत चर्चेचा विषय ठरत आहे. ताईंनी बीड विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असल्याचे जाहीर करून आपली इच्छाशक्ती प्रगट केल्याने मतदार संघातील लाडक्या महिला मतदारांमध्ये विशेषतः उत्साह संचारला आहे.

## अँड. वसंतराव उगले यांच्या निवासस्थानी महावितरणचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे यांच्या हस्ते सौर ऊर्जा पॅनलचे उदघाट्न


लातूर : सौर ऊर्जा प्रत्यक्षात एक अक्षय ऊर्जा आहे. यामुळे वीजबिल कमी येऊन आर्थिक बचत होते. याशिवाय पर्यावरण संरक्षण होते. असे ५ मेगावॅट क्षमता असलेल्या सौर ऊर्जा पॅनल व्हीपी सिंग नगर, लातूर येथील ॲड. वसंतराव उगले यांच्या निवासस्थानी बसवण्यात आले आहे. या पॅनलचे आज महावितरणचे लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे यांच्या हस्ते आणि बीएसएनएलचे जनरल मॅनेजर अनिल बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. या सौर ऊर्जा पॅनलसाठी सुमारे ३ लाखाचा खर्च असून ७८ हजार रुपयांची सबसिडी आहे. या कार्यक्रमावेळी मान्यवरांचे शाल, श्रीफळ व पुष्प गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच ॲड. वसंतराव उगले यांचाही यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी महावितरणच्या लातूर परिमंडळचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे व बिएसएनएल जनरल मॅनेजर अनिल बनसोडे यांनी सौर ऊर्जा पॅनलची आवश्यकता आणि त्याचे महत्व सांगून अधिकाधिक लोकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. प्रा. के. एम. वाघमारे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या वेळी ॲड. देवानंद गोरे, उद्योजक तथा जय किसान मशीनरीज स्टोअर्स चे संचालक विवेक उगले, पत्रकार शिवाजी कांबळे, ॲड. शिरूरे, ॲड. चंद्रहार उगिले, माने, मुळे, चेगे, रेवडकर, महादेव दत्तकर, शुभम फुटाणे आदिसह मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



## आज नवी मुंबई वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यग्रुहात संयुक्त धम्मविजय दिन (सम्राट अशोका विजयादशमी) समारंभ

पूज्य भदन्त : विमलकित्ती गुणसिरी यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य धम्मदीक्षा सोहळा आणि आंबेडकरी चळवळ म्हणजे प्रबुद्ध भारताचे बौध्दिसत्व मिशन पुस्तक प्रकाशन सोहळा आयोजन केले आहे तरी तमाम नवी मुंबईतील आखील बौद्धजनांनी या कार्यक्रमास शेकडोंच्या संख्येत उपस्थित राहून डॉ. बाबासाहेबांचे स्वप्न साकार करा, सारे विश्व मे बुद्धका नाम है यही भारतकी शान है ! प्रबुद्ध भारत अशोक सम्राटचा भारत निर्माण करा..! डॉ. बाबासाहब आबेडकर करे पुकार बौद्ध धम्म का करो स्विकार..!!

नवी मुंबई / के. एच. हनवते :- अखिल नवी मुंबई बौद्धजनांच्या वतीने ६९ वा धम्मविजय दिन ( सम्राट अशोक विजयादशमी दिन ) व धम्मदीक्षा सोहळा शनिवार दिनांक १२ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० ते दुपारी ०२ वाजेपर्यंत विष्णुदास भावे नाट्यग्रुह वाशी नवी मुंबई येथे आनंदोत्सव साजरा करण्याचे आयोजन केले आहे. तरी या कार्यक्रमास नवी मुंबईतील आखील बौद्धजनांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे ही विनंती. कारण की याच दिवशी आपल्या सर्वांचे भारत भाग्यविधाते परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अशोक विजया दशमीला १४ ऑक्टोबर १९५६ रोजी प्रथम धम्मदीक्षा घेऊन नंतर आपल्या लाखों अनुयायांना स्वहस्ते धम्मदीक्षा देऊन पहिला धम्मविजयदिन साजरा केला होता आणि सुमारे एक हजार वर्षे भारतातून लुप्त झालेल्या तथागत बुद्ध आणि त्यांचा धम्म यांचे आपल्या मातृभूमीत पुनरागमन घडवून जंगी स्वागत केले होते. कलिंग देशावरील युद्ध विजयात झालेल्या अमानुष कत्तलीने पश्चातापदग्ध होऊन सम्राट अशोकाने युद्धत्याग करून बुद्धविजयाची म्हणजेच त्यांच्या धम्मविजयाची कास धरून सारे विश्वच बौद्धमय करण्याची प्रतिज्ञा केली होती. त्याच सम्राट अशोकाच्या पावलावर पाऊल ठेवित अशोक विजया दशमीच्याच दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मदीक्षा घेऊन भारत बौद्धमय करण्याचा संकल्प केला होता. धम्मविजय हाच बुद्ध आणि बाबासाहेबांचा माणुसकीचा खरा वारसा आहे. हा वारसा पुढे नेण्यासाठी आपण धम्मदीक्षेचा कार्यक्रम आयोजित केला आहे. त्याच बरोबर बाबासाहेबांच्या विचारांचे सच्चे वारस बनण्यासाठी बोधिसत्ततनय व बोधिसत्ततनया म्हणजेच बोधिसत्वाचे पुत्र आणि बोधिसत्त्वाची कन्या म्हणून प्रतिज्ञाबद्ध होण्याचा दीक्षा समारंभ करणार आहोत. या प्रसंगी पूज्य भदन्त : विमलकित्ती गुणसिरी हे मार्गदर्शन करून बोधिसत्ततनय / बोधिसत्ततनया बनण्याच्या प्रतिज्ञांची दीक्षा देणार आहेत. या अपूर्व कार्यक्रमाचा बहुसंख्येने लाभ घ्यावा ही विनंती. कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि प्रमुख मार्गदर्शक : पूज्य भदन्त विमलकित्ती गुणसिरी यांची प्रमुख उपस्थितीत आनंद उत्सव साजरा करण्यात येणार आहे, (महानाग साक्यमुनि विज्ञासन या भारतातील पहिल्या बुद्धिस्ट सेमिनरीचा प्रशिक्षित भिक्षू संघ उपस्थितीत




रहाणार आहे तरी समस्त बौद्धजनांनी स्थळ :- विष्णूदास भावे नाट्यगृह वाशी नवी मुंबई येथे दिनांक १२/१०/२०२४ रोजी सकाळी १० ते ०२ या वेळेत उपस्थित रहावे. सुचना : १) सर्वांनी शुभ्र वस्त्र परीधान करुन वेळेवर उपस्थित रहावे. २) धम्मदीक्षेसाठी आगाऊ नांव नोंदणी करणे आवश्यक आहे.३) वयोगट १० ते २० वर्षे मुला/मुलींना धम्मदीक्षा घेण्यासाठी पालकांनी कार्यक्रमाला अवश्य घेऊन यावे. ४) सर्वांसाठी भोजन व्यवस्था केली आहे. नांव नोंदणीसाठी अखिल नवी मुंबई नागरी बुद्ध जयंती महोत्सव समिती यांच्याशी संपर्क करावा.

लातूर शहर महानगर पालिका लातूर अंतर्गत लातूर नगर पथ विक्रेता समीतीची नुकतीच निवडणुक होऊन त्या निवडणुकीत त्र्यंबक गुरुनाथ स्वामी, मनोज बाबुराव शिंदे, गौसमिंया बशिरखाँ गोलंदाज, माजीद लाडजी बागवान, वैशाली हणमंत पडवळ, ऊषाताई प्रकाश धावारे, व दिपमाला जयराम तुपकर या सर्व सातही उमेदवारांची बिनविरोध निवड झाली, वरील सर्व नवनिर्वाचित लातूर नगर पथ विक्रेता समितीच्या सदस्यांचा जुने बसस्थानका शेजारील बाबा स्वेटर बाजार येथे शाल पुष्पहार देऊन शुभेच्छा देताना बाबा शेख व त्यांचे स्वेटर विक्रेते




## धाराशिव येथे भीमशक्ती सामाजिक संघटनेची आढावा बैठक संपन्न

धाराशिव/प्रतिनिधी :- धाराशिव येथील शासकीय विश्राम गृह येथे भीमशक्ती सामाजिक संघटनेचे मराठवाडा संघटक तथा धाराशिवचे पक्षनिरीक्षक चंद्रकांत खरात सर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्त्यांच्या निवडी व आढावा बैठक संपन्न झाली आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, सध्या विधानसभेच्या निवडणुका जवळ आल्या आहेत त्या अनुषंगाने भीमशक्ती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत हांडोरे साहेब यांच्या आदेशावरून संघटनेचे मराठवाडा संघटक तथा उस्मानाबाद/धाराशिवचे पक्ष निरीक्षक चंद्रकांत खरात सर यांच्या मार्गदर्शनाखाली आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सध्या विधानसभेच्या निवडणुका ह्या काही दिवसातच होणार आहेत त्या अनुषंगाने संघटनेचे ध्येय व धोरण आणि या विधानसभेच्या निवडणुकीत संघटनेची काय भूमिका राहणार या विषयावर पक्षनिरीक्षक चंद्रकांत खरात सर यांनी सखोल मार्गदर्शन कार्यकर्त्यांना केले व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या यावेळी निवडी करून त्यांचे स्वागत करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.




यावेळी धाराशिवचे पक्ष निरीक्षक चंद्रकांत खरात सर, दिलीप वाघमारे, महिला जिल्हाध्यक्ष ड.ज्योती बडेकर, जिल्हाध्यक्ष मेसा जानराव, शहरध्यक्ष बालाजी झेंडे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख सुनील धिमधिमे, प्रा.तात्या वाघमारे, दिलीप वाघमारे, विकास हावळे, अजय वाघमारे, प्रवीण, समाधान धाकतोडे डॉ.ढवळे, माजी सरपंच हावळे, समाधान गायकवाड, महादेव भोसले,शेख अलाउद्दीन, अक्षय शिनगारे, अशोक सरवदे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE